महाराष्ट्र विधान परिषदेच्या ०३ पदवीधर (औरंगाबाद,पुणे , नागपूर) व ०२ शिक्षक मतदारसंघांच्या (अमरावती व पुणे) रिक्त होणाऱ्या जागांसाठी व्दैवार्षिक निवडणूक-२०२६ मधील आचारसंहिता कालावधीतील आदर्श आचारसंहितेमधून सूट मिळण्याबाबतचे प्रस्ताव तपासणीकरीता छाननी समिती गठीत करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: एमसीसी-२०२६/प्र.क्र.८५/३३/नि-११**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
पाचवा मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २८ सप्टेंबर २०२६

**संदर्भ** :- भारत निवडणूक आयोगाकडील प्रेस नोट पत्र क्र.ECI/PN/११८/२०२६, दिनांक २२.९.२०२६

**शासन परिपत्रक** :-

भारत निवडणूक आयोगाकडील दिनांक २२.९.२०२६ च्या प्रेस नोट पत्राद्वारे महाराष्ट्र विधान परिषदेच्या ०३ पदवीधर (औरंगाबाद,पुणे , नागपूर) व ०२ शिक्षक मतदारसंघांच्या (अमरावती व पुणे) रिक्त होणाऱ्या जागांसाठी व्दैवार्षिक निवडणूक-२०२६ बाबत निवडणुक कार्यक्रम जाहिर करण्यात आलेला आहे. व दिनांक २२.९.२०२६ पासून सदर ०३ पदवीधर व ०२ शिक्षक मतदारसंघामध्ये तात्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर मतदारसंघामध्ये आदर्श आचार संहितेबाबत भारत निवडणूक आयोगाने दिनांक २६.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर सूचना विचारात घेतल्यानंतर आदर्श आचार संहितेच्या कालावधीत एखाद्या प्रस्तावास मान्यता देणे वा कार्यवाही करण्याबाबत संबंधित कार्यालय/मंत्रालयीन विभाग आग्रही असल्यास, असे मार्गदर्शनाबाबतचे अथवा आचारसंहितेमध्ये सुट मिळण्याबाबतचे प्रस्ताव भारत निवडणूक आयोगास सादर करण्याकरीता मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांस शिफारस करण्याकरीता मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| (अ) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| (ब) अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| (क)अपर मुख्य सचिव (वित्त) ,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| (ड) प्रस्तावाशी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव. | सदस्य |

२. छाननी समितीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल:-

(१) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सादर केलेल्या प्रस्तांवाची छाननी, आदर्श आचारसंहितेसंदर्भात भारत निवडणूक आयोगाव्दारे निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन करण्यात येईल.

(२) छाननी समितीने शिफारस केलेले प्रस्ताव समितीच्या शिफारशींसह मुख्य निवडणूक अधिकारी यांस पाठविण्यात येतील.

(३) छाननी समितीने शिफारस केलेले प्रस्ताव मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या अभिप्रायासह भारत निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात येतील.

३. आदर्श आचारसंहिता कालावधीत प्रस्ताव सादर करताना मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी पुढीलप्रमाणे दक्षता घ्यावी :-

(अ) राज्यातील सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी अथवा त्यांचे अधिनस्त कोणत्याही आस्थापनेने कोणत्याही परिस्थितीत कोणताही प्रस्ताव किंवा संदर्भ थेट भारत निवडणूक आयोगास अथवा मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडे सादर करु नये.

(ब) शासनाच्या सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी प्राप्त प्रस्तावाबाबत भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचना व निदेशानूसार प्रस्तावाची प्रथमत: प्रशासकीय विभागस्तरावर तपासणी करुन संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने आपली स्वयंस्पष्ट धारणा पक्की करावी व तद्नंतर आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव छाननी समितीमार्फतच सादर करण्यात यावा. प्रस्तावांमध्ये तातडीबाबत तसेच प्रस्तावित काम आाचार संहिता कालावधीत टाळता न येण्याजोगे असल्याबाबत विवक्षितपणे नमुद करण्यात यावे. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांनी त्यांच्याकडील प्राप्त प्रस्ताव उक्त कार्यपध्दतीनुसारच मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडे सादर केले जातील, याची दक्षता घ्यावी.

(क) भारत निवडणूक आयोगास संदर्भ निकाली काढण्यास काही कालावधी आवश्यक असल्याने अंतिम क्षणी प्रस्ताव पाठविणे टाळावे.

४. भारत निवडणूक आयोगाकडील दिनांक २२.९.२०२६ रोजीच्या प्रेसनोटनुसार आचारसंहिता दिनांक २२.९.२०२६ पासून तात्काळ प्रभावाने लागू झाली आहे. या निवडणूकीची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी दिनांक ३१.१०.२०२६ पर्यतचा कालावधी नमुद केलेला असला तरी भारत निवडणूक आयोगाकडील दिनांक २.१.२०२४ (एमसीसी-इनफोर्समेंट) रोजीच्या पत्रातील सुचनेनुसार या निवडणूकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर विधान परिषद निवडणूक आचारसंहिता आपोआप संपुष्टात येते. हि बाब विचारात घेता सदर आचारसंहिता कालावधी संपुष्ठात आल्यानंतर सदर छाननी समिती आपोआप विसर्जित होईल.

५. उपरोक्त सूचना लक्षात घेऊन सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी उचित कार्यवाही करावी व सदरच्या सर्व सूचना आपल्या अधिनस्त कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०९२८११०४५०३२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

VIKRAM VISHNU NIKAM

Digitally signed by VIKRAM VISHNU NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=General Administration Dept, 2.5.4.20=4D634E2FA0834759B8F84AE1FFC6DC3F9EBB91E308959F332DC4E59E12215148, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9EB70F4C28BFB91710D15B96D47B5726FE76A08D143EB22AC25A88A6935601BD, cn=VIKRAM VISHNU NIKAM
Date: 2026.09.28 11:06:07 +05'30'

**( विक्रम निकम )**
**अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रति,**

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

**प्रत :-**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सह सचिव,मुख्य सचिव कार्यालय,मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
३. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
४. अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणुक अधिकारी यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
५. विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी (पदवीधर व शिक्षक मतदारसंघ ), प्रादेशिक विभाग पुणे,अमरावती, नागपुर, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर )
६. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)
७. सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी
८. उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)